व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रूपांतरण करण्यास, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासन मान्यता देणेबाबत......

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१८/प्र.क्र.१०२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: २५ जून, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय क्र.मान्यता-२०१५/(१४३/२०१५)/तांशि-५, दि. १३.१०.२०१६
२) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१५/(१४३/२०१५)/तांशि-५ दि. ३०.०१.२०१८
३) शासन पत्र क्र.टीईएम-२०१८/प्र.क्र १०२/तांशि-४, दि. २२.०३.२०१८
४) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.वेस्टर्न/१-३५०८६८१९१०/२०१८/इओए, दिनांक २६/०४/२०१
५) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१८/५८१, दिनांक ११.०५.२०१८

प्रस्तावना :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ १) येथील पत्रान्वये शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ या पदविका संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रूपांतरण करण्यास मान्यता दिली आहे. सदर मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भ २) येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे सदर पदविका संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रूपांतरण करण्यास शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ १) येथील पत्रान्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भ २) येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे "शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ" या पदविका संस्थेचे "शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ". या पदवी पातळीच्या संस्थेत रूपांतरण करण्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर संस्थेतील पदवी अभ्यासक्रम व त्यांची प्रवेशक्षमता खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे असेल.

| संस्थेचे नाव | रूपांतरण (श्रेणीवर्धन )झाल्यानंतर संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रमाचा स्तर | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ | विद्युत अभियांत्रिकी | पदवी | ६० |
| | | यंत्र अभियांत्रिकी | पदवी | ६० |
| | | संगणक अभियांत्रिकी | पदवी | ६० |
| | | अणुविद्युत व दूरसंचारण अभियांत्रिकी | पदवी | ६० |
| | | स्थापत्य अभियांत्रिकी | पदवी | ६० |

२. सदर शासकीय तंत्र निकेतन संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रूपांतरण करताना खालील बाबीचे अनुपालन करण्यात येईल:-

१) सदर संस्थेत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेने सुरू करण्यात आलेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या मान्यतेसंदर्भाच्या बाबींबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या अटींची पूर्तता करण्याची जबाबदारी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांची राहील.

२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार सदर संस्थेत पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली मंजूर पदे विचारात घेऊन नवीन पदांच्या निर्मितीसाठी व संस्थांमध्ये सध्या असलेल्या पदांच्या रूपांतरणांसाठी शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मान्यता-२०१५/(१४३/२०१५)/तांशि-५, दिनांक १३/१०/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली असून त्यानुसार आवश्यक ती समायोजनासह सर्व कार्यवाही करण्यात येईल.

३) सदर संस्थेत अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार आवश्यक असणारी यंत्रसामुग्रीसाठी आणि पदनिर्मिती रुपांतरणांकरीता येणाऱ्या खर्चासाठी आवश्यक असलेली वित्तीय तरतूद करण्यास शासन

निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मान्यता-२०१५/(१४३/२०१५)/तांशि-५, दिनांक १३/१०/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४) सदर रूपांतरीत पदवी संस्थेचे संलग्नीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्याशी करण्याबाबतची जबाबदारी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांची राहील.

५) सदर संस्थेतील पदवी अभ्यसक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

७) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या उपरोक्त संदर्भ क्र. १) येथील EoA पत्रात रूपांतरणानंतरचे संस्थेचे नाव "शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, यवतमाळ" व संलग्नीकरण विद्यापीठाचे नाव "डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड" अशी दुरूस्ती करून घेण्याची जबाबदारी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय व प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, यवतमाळ यांची राहील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या तस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०६२५१८०५४०५००८ असा आहे. सदर शासन निर्णय हा डिजीटल स्वाक्षरीने ांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय औ. धारूरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगाव, जिल्हा -रायगड -४०२ १०३ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, धामनगाव रोड, यवतमाळ- ४४५ ००१.

५. अवर सचिव, तांशि-३/कक्ष अधिकारी (तांशि-३/तांशि-५/तांशि-७/सांशि-१)उ.व तं.शि.वि.मंत्रालय, मुंबई.

६. मा. मंत्री/राज्यमंत्री (उ.व तं.शि.) यांचे खाजगी सचिव

७. सदस्य सचिव अखिल भारतीय ,तंत्र शिक्षण परिषद ७ ,वा मजला चंद्रलोक, बिल्डींग जनपथ, नवी दिल्ली- ००१ ११०

८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई

९. निवड नस्ती/तांशि-४